महावितरण

(महाराष्ट्र शासन अंगीकृत)

CIN : U40109MH2005SGC153645

एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,मुंबई ४०० ०१९

email : recruitment4msedcl@gmail.com website : www.mahadiscom.in

दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०१३५०५ फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र.मासंवि/सेप्र/शि.ऊ./ 20136 दिनांक: 27/08/2021

प्रति,
मुख्य अभियंता,
म.रा.वि.वि.कं.मर्या.,
अमरावती/अकोला/औरंगाबाद/भांडुप/बारामती/जळगांव/चंद्रपूर/
गोंदिया/कल्याण/कोल्हापूर/लातूर/नागपूर/नांदेड/नाशिक/पुणे/रत्नागिरी.

विषय:- शिकाऊ उमेदवारी अधिनियम- १९६१ मधील तरतुदीनुसार **"महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास मंडळ"** यांच्या ०२ वर्षे कालावधीच्या **डिप्लोमा इन इलेक्ट्रीशियन** (Diploma in Electrician) या अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र शिकाऊ उमेदवारीसाठी ग्राह्य धरणेबाबत.

संदर्भ: १) प्रशासकीय परिपत्रक क्र.३६५ दि.२१.११.२००१
२) प्रशासकीय परिपत्रक क्र.३७१ दि.२६.०८.२००२.
३) प्रशासकीय परिपत्रक क्र.३७५ दि.१९.१२.२००२.
४) शासन निर्णय क्रमांक क्र.व्हीओसी-२०१२/५९१/प्र.क्र.२४५ (ब)/ व्यशि-४, दिनांक २८.०९.२०१२.
५) शासन निर्णय क्र..व्हीओसी-२०१२/६९७/प्र.क्र.२९२ व्यशि-४, दिनांक २१.०१.२०१३.
६) भारत सरकारचे राजपत्र, कौशल्य विकास एवं उद्यमशीलता मंत्रालयाची अधिसुचना दि.०७.०९.२०१७
७) परिपत्रक क्र.मासंवि/सेप्र/न.क्र.२१२/११२३२ दि.१८.०५.२०१८.
८) शासन निर्णय क्र.व्हीओसी-२०२०/प्र.क्र.३७/व्यशि-४ दि.०६.०७.२०२०.
९) शासन निर्णय क्र.व्हीओसी-२०२१/प्र.क्र.१०/ कौशल्य-२ दि.११.०२.२०२१.

-----------------

१. उपरोक्त विषयास अनुसरून प्रशासकीय परिपत्रक क्र.३७५ दि.१९.१२.२००२ अन्वये पुर्वीच्या म.रा.वि.मंडळ व मंडळाच्या विभाजनानंतर अस्तित्वात आलेल्या महावितरण कंपनीमध्ये शिकाऊ अधिनियम-१९६१ मधील तरतुदीनुसार औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या पात्र व्यवसाय प्रमाणपत्रधारक उमेदवारांना व्यवसाय शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षणासाठी (Trade Apprentice in designated Trades) घेतले जाते.

२. भारत सरकारच्या राजपत्रानुसार कौशल्य विकास एवं उद्यमशीलता मंत्रालयाची (Ministry of skill Devlopment And Entrepreneurship Notification) अधिसुचना दि.०७.०९.२०१७ अन्वये महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षा परीक्षा बोर्ड (MSBVEE) , मुंबई (सध्याचे नांव **"महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास मंडळ"**) यांचे एकुण १२३ व्यवसाय / पाठयक्रमाना व्यवसाय शिकाऊ उमेदवारी (Trade Apprentice in designated Trades) करीता मान्यता दिली आहे. त्यामधील अ.क्र. ३१ नुसार इलेक्ट्रीशियन या दोन वर्षाच्या अभ्यासक्रमास "इलेक्ट्रीशियन" व "वायरमन" या व्यवसायासाठी शिकाऊ उमेदवारी देणेस मान्यता देणेत आलेली आहे.

३. **महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास मंडळ"** यांनी प्रमाणित केलेल्या अभ्यासक्रमाना यापुर्वी **"प्रमाणपत्र अभ्यासक्रम"** (Certificate Course) असे संबोधिले जात होते. तथापि संदर्भ क्र.५ नुसार **"प्रमाणपत्र अभ्यासक्रम"** (Certificate Course) ऐवजी **"पदविका अभ्यासक्रम"** (Diploma Course) अशा नावाने प्रमाणपत्र देणेस मान्यता दिलेली आहे.

४. भारत सरकारचे राजपत्र, कौशल्य विकास एवं उद्यमशीलता मंत्रालयाची अधिसुचना दि.०७.०९.२०१७, महाराष्ट्र शासनाचा, शासन निर्णय क्र.व्हीओसी-२०१२/५९१/प्र.क्र.२४५ (ब)/ व्यशि-४, दिनांक २८.०९.२०१२ व महाराष्ट्र शासन निर्णय क्र..व्हीओसी-२०१२/६९७/प्र.क्र.२९२ व्यशि-४, दिनांक २१.०१.२०१३ नुसार **"महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास मंडळ"** यांच्या ०२ वर्षे कालावधीच्या **डिप्लोमा इन इलेक्ट्रीशियन** (Diploma in Electrician) या अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र शिकाऊ उमेदवारी १९६१ नुसार महावितरण कंपनीमध्ये वीजतंत्री व तारतंत्री या शिकाऊ उमेदवारीसाठी ग्राह्य धरणेस सक्षम अधिकारी यांनी मंजूरी दिलेली आहे.

C:\Users\2406101\Desktop\12.08.2021 Bandra Office Work\Apprentice 09.08.2021\Zone lette_Apprentice_11.08.2021.doc

Scanned with CamScanner

५. सबब, महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परिक्षा मंडळ, मुंबई (MSBVE) (सध्याचे नांव **"महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास मंडळ"**) यांच्या ०२ वर्षे कालावधीच्या **डिप्लोमा इन इलेक्ट्रीशियन** (Diploma in Electrician) या अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्रधारक उमेदवारांना महावितरण कंपनीमध्ये वीजतंत्री व तारतंत्री या व्यवसायाच्या शिकाऊ उमेदवारीसाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या पात्र व्यवसाय प्रमाणपत्रधारक उमेदवारांसोबत ग्राहय धरणेत यावे. तसेच शिकाऊ उमेदवारीबाबत कंपनीने वेळोवेळी निर्गमीत केलेली प्रशासकीय परिपत्रके, परिपत्रके व मार्गदर्शक सुचना इत्यादींचे काटेकोर पालन करावे.

सोबत:-संदर्भीय शासन निर्णय.

(अरविंद भादिकर)
कार्यकारी संचालक (मासं)

**<u>प्रत सविनय सादर :-</u>**

१) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या., प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद/कल्याण.
२) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या., प्रादेशिक कार्यालय, पुणे/नागपूर.

**<u>प्रत रवाना :-</u>**

महाव्यवस्थापक (मासं), म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, प्रकाशगड, मुंबई.